| | | **५.** प्रासंगिक कराराच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी विविध प्रतिष्ठानांना बसेस उपलब्ध करण्याबाबत धोरण निश्चित करणे . | |
| | | **६.** महामंडळाच्या सेवा सुविधांचे डीजिटल मार्केटींग ,बसेसची आकर्षिक रंगसंगती, सेवांचे ब्रॅंड,लोगो व घोषवाक्य याकरिता सल्लागार नेमणे. | |
| | आस्थापना पर्यवेक्षक | • जनसंपर्क शाखेतील एकूण यंत्रणेशी संबंधींत आस्थापना विषयक कामे, डेड स्टॉक संबंधीची कामे.<br>• माहितीच्या अधिकाराबाबतची सर्व संबंधित कामे / पत्रव्यवहार<br>• भूमिपूजन / उद्घाटन समारंभ इ. प्रसंगी झालेल्या खर्चाची नोंदवहीत नोंद करुन सदर खर्चास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी मिळविण्यासाठी सादर करणे.<br>• १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे इ. दिवसाच्या कार्यक्रमांचे आयोजन व त्यासंबंधीत कामे.<br>• छपाईविषयक कामासंबंधी निविदा, छपाई कामे, देयके, हिशोब व संबंधित सर्व पत्रव्यवहार.<br>• निविदा सुचना वृत्तपत्रांना प्रसिध्दीसाठी पाठविणे. त्यांच्या देयकाबाबत कार्यवाही करणे व अनुषंगिक पत्रव्यवहार.<br>• महामंडळास भेट देणा-या प्रतिष्ठीत पाहुण्यांचा / पत्रकारांचा पाहुणचार, बैठकी आयोजन.<br>• वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादि प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसिध्दीस देण्यात येणाऱ्या सर्व जाहिरातींच्या खर्चाची नोंदवहीत नोंद करुन सदर खर्चास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी मिळविण्यासाठी सादर करणे.<br>• प्रसिध्दी पत्रके / खुलासे प्रसारीत करणे व त्याच्या योग्य नोंदी ठेवणे.<br>• छपाईविषयक कामे, परिवहन पथिक अंकाचे वितरणावर देखरेख, हिशोब ठेवणे, लेटर हेडस, व्हिजिटींग कार्डस्. भितींपत्रके छपाईसंबंधी निविदा काढणे. खर्चास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी मिळविण्यासाठी सादर करणे.<br>• सर्व प्रकारचे निर्लेखन प्रस्ताव. टेलिफोन, चहापान व पेटी बिलाची कामे. आगाऊ रक्कम व अनुषंगिक कामे. पुस्तक खरेदी संबंधी कामे.<br>• थोर महापुरुषांच्या जयंती साजरी करण्याबाबत कार्यवाही करणे<br>• प्रवासी तक्रार / सूचनांची नोंद, संबंधित पत्रव्यवहार.<br>• रा.प. कर्मचाऱ्यांच्या ओळखपत्राविषयी सर्व अनुषंगिक कामे.<br>• अधिस्विकृतीधारक पत्रकारांना देण्यात येणा-या मोफत पासाचे वाटप.<br>• रा. प. साठी राज्यातील वृत्तपत्रांची मान्यताप्राप्त यादी तयार करणे व अनुषंगिक पत्रव्यवहार (यादी त्वरीत तयार करणे - कालमर्यादीत ).<br>• वेळोवेळी जनसंपर्क शाखेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या रा.प. महामंडळाच्या कार्यक्रमाचे आयोजन व त्यासंबंधीत कामे.<br>• जादा वाहतूकीचे नियोजन करण्यासाठी दरमहा लग्नतिथी, धार्मिक उत्सव, यात्रा, सलग सुट्ट माहिती वाहतूक शाखेस कळविणे. | |
| | | **लेखा खाते** | |
| | वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी | १. वार्षिक योजना आणि पंचवार्षिक योजना तयार करणे आणि त्या अनुषंगाने येणारी इतर कामे म्हणजे मंजुरी घेणे, आढावा घेणे व सुधारणा करणे इत्यादी. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २. वार्षिक अर्थ संकल्पीय अंदाज व सुधारीत अंदाज तयार करणे आणि तत्सम मंजुरी घेणे, आढावा व सुधारणा याबाबतची कामे पाहणे. | |
| | | ३. भांडवली आणि महसूली खर्च व उत्पन्न यावर अर्थसंकल्पीय नियंत्रण ठेवणेबाबत कार्यवाही करणे. | |
| | | ४. सुधारीत संकल्पीय कार्यक्रमासहीत अर्थसंकल्पीय कार्यक्रमांना वित्त पुरवठा करण्यासाठी भांडवली निधी उभारणे व त्या अनुषंगाने येणारी कामे. | |
| | | ५. वार्षिक व मासिक रोख साधन सामग्रीचे भांडवली खर्च, उत्पन्न खर्च भांडार व खरेदी इत्यादीबाबत संशयीत लेखे आढावा अद्ययावत करणे, रोकड रकमेचा चढउतार विचारात घेऊन प्रतिबंधात्मक उपाय योजना आखणे जेणेकरुन अपु-या रोकड पुरवठयावर मात करता येईल व जास्त रोकड असल्यास त्याची फायदेशिर गुंतवणूक करणे. | |
| | | ६. चालू खाते व दैनंदिन जमा खाते बँकेमध्ये उघडणे व त्यामध्ये फेरफार करणे. मध्यवर्ती कार्यालयाला निधी पाठविणे, पाठविलेल्या निधिचा खात्याचा व इतर खात्यांचे समायोजन करणे, इत्यांदीसह निधी व्यवस्थापन पहाणे. | |
| | | ७. मुदत ठेव खाते व मुदतीवरील व्याज देण्यासाठी उघडलेले बँक खाते यासह मुदत ठेव योजनेचे व्यवस्थापन करणे, व्याज दर व इतर अटी, शर्ती विचारात घेवून मुदत ठेव योजनेचा आढावा घेणे व त्यासंबंधीच्या इतर बाबी पाहणे. | |
| | | ८. कर्जाच्या व मुदत ठेवीच्या परतफेडीसाठी आणि देय तारखांना व्याज देण्यासाठी निधीची व्यवस्था करणे. | |
| | | ९. आयकर सल्लागार यांचे सल्ल्यानुसार परतावा, सुधारित परतावा दावे कर भरणे, कर परत करणे, सुनावणी, दाव्यासंबंधी तपासणी आदेश इ. आयकर विषयक बाबी पाहणे. | |
| | | १०. प्रवासी कर, विक्रीकर, अबकारी कर, जकात, मोटर वाहन कर इ. करांविषयी सल्ला आवश्यक असेल तेंव्हा बाहय तज्ञांच्या सल्ल्याने विभागांना मार्गदर्शन करणे व त्यासंबंधीची कामे पाहणे. | |
| | | ११. प्रवास कर, वाहन कर, आयकर, चासीस देयके, बस बांधणी बाबत बाहय संस्थांची देयके,खाते वाहन खरेदी देयके, कर्जाची परतफेड, व्याज आणि इतर मोठी देयके नियमानुसार अंतर्गत तपासणी व कार्यपध्दतीच्या अधिन राहून पूर्व लेखा परिक्षणाचे अनुषंगाने मध्यवर्ती कार्यालयातून अदा करणे. | |
| | | १२. महामंडळाच्या निधीवर परिणाम करणा-या व उत्पन्न खर्चासंबंधी वित्तीय परिणामांच्या सर्व प्रस्तावांची तपासणी व सल्ला देणे. संचालक मंडळ व महामंडळाच्या उपसमित्या, महामंडळाने अधिका-यांच्या नेमलेल्या समित्या (निविदा व दरपत्रके यांना अंतीम स्वरुप देऊन मंजुरी देण्याकरीता खातेनिहाय निविदा समिती) आणि अधिकार प्रदान केलेले आहे असे वैयक्तिक अधिकारी यांच्या सर्व प्रस्तावांचा समावेश आहे. निर्लेखन, प्रस्तावाचे व तृतीय पक्ष नुकसान भरपाई दावे इत्यांदी प्रस्तावांचाही समावेश आहे. | |
| | सहा. मुख्य लेखा | १३. घसारा निधी, विमा निधी व इतर निधींच्या अनुषंगाने येणा-या बाबी. | |
| | अधिकारी | १४. दरपत्रके, मर्यादित निविदा, खुल्या निविदा, खरेदीचे प्रस्ताव, दर करार आणि विविध पातळीवरील खरेदी आदेश यासंबंधी पूर्व लेखा परिक्षणाच्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने देखरेख ठेवणे व धोरणांचा आढावा घेणे. | |
| | | १५. लेखा खात्याशी संबंधीत विधीमंडळ प्रश्नांना उत्तरे देणे. | |
| | | १६. वसूली, आगाऊ रकमेचे समायोजन, देणी, विविध संस्थांकडील येणी, लेख्यांमधील अधिक्य, कर्मचा-यांकडून वसुली इ. बाबत सनियंत्रण ठेवणे. | |
| | | १७. प्रशासन अहवालातील वित्तीय प्रकरण तयार करणे आणि शासन व इतर प्राधिका-यांना वित्तीय बाबीसंबंधी माहिती व अहवाल सादर करणे. | |
| | | १८. सर्व स्तरावरील लेखा कक्ष व लेखा शाखांचे परिक्षण करणे. | |
| | | १९. तिन्ही कार्यशाळांमध्ये दर्जेदार मूल्यांकन कार्यपध्दतीची अंमलबजावणी करता यावी म्हणून मूल्यांकन लेखा अधिकारी हे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व संपूर्ण नियंत्रणाखाली काम करण्याचे नियोजन करणे. | |
| | | २०. एखाद्या विविक्षित विषयाबाबत विविक्षित आदेश नसल्यास सदर बाबी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशासाठी नजरेस आणणे. | |
| | | २१. महामंडळाचे वार्षिक हिशेब तयार करणे, कामगार करारासंबंधाची कामे, भविष्य निर्वाह निधी व उपदान निधीचे हिशेब व त्या विश्वस्त निधीची देखभाल, सर्व राज्य परिवहन कार्यालयांना अदा केलेल्या रकमांचे पूर्व लेखा आणि त्या पश्चात लेखा परिक्षा, महा लेखाकार यांच्या तपासणी अहवालाचा पाठपुरावा, आणि समवर्ती संग्रह पडताळणी, धोरण व कार्यपध्दती यांच्या प्रस्तावाची छाननी इत्यादी करणे. | |
| | | २२. लेख्यासंबंधी प्रधान खाते वही म्हणजे रोकड नोंद वही, समायोजन नोंद वही, धनादेश | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नोंदवही, लेखे नोंद वही, (Ledger) लेखे संबंधाने इतर दुय्यम नोंद वहया व पुस्तके व त्या संबंधाने व्हाऊचर्स व इतर कागदपत्रे ठेवणे. | |
| | | २३.मासिक लेख्यांचे आवश्यकतेनुसार एकत्रिकरण करणे व वार्षिक नफा-तोटा पत्रक व लेखे तयार करणे. | |
| | | २४.कोषागार विषयी कामे, नियमानुसार देय असलेली महामंडळांची देणी, रोकड किंवा धनादेशाने चूकती करणे, (ज्यामध्ये वेतन व भत्ते, पुरवठादारांची देयके, कर प्रदान अग्रीम, आकस्मिक खर्च, ठेवींचा परतावा व इतर रकमा यांचा समावेश होतो.) परंतू, मध्यवर्ती कार्यालयातर्फे अदा केले जाणारे मोठे दावे की, ज्या निधिच्या व्यवस्थापनावर परिणाम होतो अशी देयके वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधकारी यांचे मार्फत हाताळली जातात. | |
| | | २५. भविष्य निर्वाह निधी, विश्वस्त निधी व त्याखाली तयार केलेल्या योजनांचे संबंधित फायदे व नियमाप्रमाणे व्यवस्थापन करणे, तसेच वर्गणीदारांच्या वर्गणीचा हिशोब ठेवणे. विश्वस्त निधींचे हिशेब ठेवणे, निधीचे वाटप व गुंतवणूक, बँक खाते चालविणे, व्याजाची वसूली, सचिवीय कामे व धोरणात्मक कामे इ. संभाळणे. | |
| | | २६. उपदान विश्वस्त निधी व त्याखाली तयार केलेल्या योजनांचे संबंधित फायदे व नियमाप्रमाणे व्यवस्थापन करणे, तसेचे उपदानाचे दायित्व परिगणीत करणे. उपदान कर्मचा-यांना अदा करणे. | |
| | | २७. कर्मचा-यांच्या सेवा व शर्तीबाबत धोरणात्मक बाबींवर तसेच कर्मचारी संघटनांबरोबर ठराविक वर्षांनी होणा-या करारासंबंधाने सल्ला देणे. | |
| | | २८. मध्यवर्ती कार्यालयामधील लेखा खात्यातील आणि लेखा खात्याच्या राज्य संवर्गीय कर्मचारी आणि अधिकारी तसेच विभागांमध्ये अंतर्गत लेखा परिक्षण कक्षात काम करणा-या कर्मचा-यांबाबत प्रशासकीय आणि आस्थापनांची प्रकरणे हाताळणे. | |
| | | २९. महामंडळातील सर्व घटकामधील लेख्या संबंधी व अंतर्गत लेखा परिक्षणामधील रचना व कार्यपध्दतीवर लक्ष ठेवणे, वेळोवेळी सातत्याने आढावा घेणे. | |
| | | ३०. महामंडळाचा वाहतूक व इतर महसूल बरोबर जमा झाला आहे किंवा नाही तसेच कार्यपध्दती व नियमानुसार निरनिराळे दावे, देयके व वेतन व कर इत्यादी देय रकमा बरोबर अदा होत आहेत या बाबत अंतर्गत तपासणीची खातरजमा करणे. | |
| | | ३१. मुख्य अंतर्गत लेखा परिक्षण अधिका-यांच्या कामावर देखरेख ठेवणे आणि शासकीय हिशेब तपासणी अहवाल प्रलंबित आणि अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल तसेच शासकीय तपासणी अहवाल याबाबतचा पाठपुरावा करणे. | |
| | | ३२. भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी तयार केलेला लेखा परिक्षण अहवाल आणि सार्वजनीक उपक्रम समितीच्या अहवालात समाविष्ट झालेल्या प्रारुप परिच्छेदांचा किंवा प्रारुप अहवालाचा अंतिम निकाल लागेपर्यंत पाठपुरावा करणे. | |
| | | ३३. विभागामधील लेखा शाखा व सर्व स्तरावरील लेखा कक्ष यांची तपासणी करणे. यामध्ये इतर खात्यांनी किंवा शाखांनी त्या संबंधाने ठेवलेल्या दप्तराचा त्यामध्ये समावेश करणे. | |
| | | ३४. या आदेशांमध्ये समाविष्ट न झालेले लेख्या संबंधी कोणत्याही शिल्लक मुद्यांवर कार्यवाही करणे. | |
| | | १. कार्यालयीन आदेश क्र.१ दि.०५.०३.९० मध्ये नमूद केलेली मुख्य लेखा अधिकारी यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यात सहा. मुख्य लेखा अधिकारी हे ढोबळ मानाने वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना सहाय्य करतील. | |
| | | २. सहा. मुख्य लेखा अधिकारी हे आपले कर्तव्य पार पाडीत असतांना शक्यतो धोरणात्मक बाबी अंतर्भूत नसलेले प्रस्ताव व धारिका त्यांच्याच पातळीवर स्वतंत्रपणे अभिप्राय किंवा निर्णय देवून निकाली काढतील. | |
| | | ३. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या अखत्यारीतील सर्व कक्षांच्या कामावर संबंधीत कक्ष प्रमुखामार्फत देखरेख ठेवणे तसेच संबंधीत कक्षाकडून अपेक्षित परिणाम साध्य करण्याकरीता त्यांना मार्गदर्शन व कार्यप्रवृत्त करणे. | |
| | | ४. लेखा खात्यासंबंधी व्यवस्थापनाला लागणारी मासिक, त्रैमासीक व वार्षिक पध्दतीने येणारी माहिती सर्व विभाग व घटकांकडून ठरलेल्या तारखांना येत असल्याची व सदरची माहिती संबंधित कक्ष प्रमुखांनी त्यांना ती सादर केली आहे याची खातरजमा करणे. | |
| | | ५. नोंदणी कक्षाची मासिक लेख्यासाठी येणा-या माहितीची उपयुक्ततेच्या दृष्टीने रचना करणे. महामंडळाचे वार्षिक लेखे तयार करतांना सत्य आणि योग्य चित्र लेख्यामध्ये घेण्यासाठी नजरेत चटकन येणा-या चूका, इतर विपर्यास चुकीच्या नोदी, चुकीचे वर्गीकरण इत्यादी बाबी टाळण्यासाठी पाठविण्यात येणारी सावधान सूची बाबत प्रत्येक घटकाबरोबर संदर्भ करणे या कामावर अतिशय काटेकोर नियंत्रण ठेवणे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६. सहा. मुख्य लेखा अधिकारी हे भविष्य निर्वाह निधी व उपदान विश्वस्त निधी अनुक्रमे संयुक्त सचिव व सहाय्यक सचिव म्हणून काम पाहातील. | |
| | | ७. संगणित्र केंद्रावर योग्य सहकार्य व संबंध साधून प्रत्येक वर्षी भविष्य निर्वाह निधी वर्गणी धारकांच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या ठरवून दिलेल्या मुदतीत छापून घेणे. दोन्ही विश्वस्त निधीच्या नियमीत बैठका घेण्यात ते मुख्य लेखा अधिकारी यांना सहाय्य करतात. राज्य संवर्ग कर्मचारी आणि वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांचे अंतिम दावे व अंशत: अंतिम दावे यावर ते मुख्य लेखा अधिकारी यांच्या वतीने सही करण्याच्या मुख्य लेखा अधिकारी यांचे अधिकार बजावतात. खाते प्रमुख/शाखा प्रमुख, घटक प्रमुख व वर्ग - १ दर्जाचे अधिकारी यांच्या भविष्य निर्वाह निधीतून तात्पुरत्या कर्जाना सहमती देणे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे अधिकारातील काम पाहणे. | |
| | | ८. विशेषत: वेगवेगळया करारातून निर्माण होणा-या किरकोळ बाबींवर ते स्वतंत्र निर्णय देतील आणि धोरणात्मक बाबीं बाबतच्या प्रस्तावावर ते आपले अभ्यासपूर्ण मत/अभिप्राय/शिफारस नोंदवून वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर करतील. | |
| | | ९. मध्यवर्ती कार्यालयातील लेखा खात्यासंबंधी प्रशासकीय व आस्थापना विषयी बाबींवर वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या वतीने नियंत्रण ठेवतील. आलेल्या कागदपत्रांची वेळेत विल्हेवाट लावण्याची ते खबरदारी घेतील व सर्व कक्षांच्या आठवडा नोंदवहया ते पाहतील. | |
| | | १०. महामंडळाची राज्यातील विविध घटक/आगारे येथील लेखा शाखेच्या कामकाजाची नमुन्या दाखल त्यांना तपासणी करणे. तपासणीच्या वेळी त्यांच्या नजरेत आलेल्या बाबींवर घटक प्रमुखांशी पत्रव्यवहार करुन चुका दुरुस्ती होईपर्यंत त्यांचा पाठपुरावा करावा लागेल. | |
| | | ११. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडून आलेला वाणिज्यीक अहवाल, तसेच सार्वजनिक उपक्रम समिती यांचे अ हवालातील अभिप्राय व शिफारशीवर संबंधित खातेप्रमुखाकडून माहिती घेऊन उत्तरे/खुलासा सादर करणे. याशिवाय तथ्यपूर्वर्ण टिप्पणी व प्रारुप परिच्छेदावर संबंधित खातेप्रमुखांकडून माहिती घेऊन उत्तरे सादर करणे. | |
| | | १२. लेखा खात्यातील कक्ष प्रमुखांमध्ये तसेच लेखा खात्याचा वित्त विभागामधील अधिका-यांमध्ये सहकार्य व समन्वय साधला जातो आहे याची ते खातरजमा करतील. त्याच प्रमाणे इतर खात्याकडून लेखा खात्यामार्फत सादर करण्यात येणारे मुद्दे/प्रस्ताव याबाबत निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना सहाय्य करण्यासाठी महामंडळाच्या इतर खात्याबरोबर समन्वय साधणे. | |
| | | १३. आकस्मीक खर्चाचे प्रस्ताव, विधी सल्ला फि खर्च, वैद्यकीय खर्चांची देयके, अदा करण्याबाबत सहमती देण्याबाबतचे प्रस्ताव, धनादेशावर सहया करणे आदी बाबत त्यावेळचे व्यवस्थापक (लेखा) व मुख्य लेखा अधिकारी यांनी अशा प्रस्तावास सहमती देण्याबाबत महामंडळाच्या विविध ठरावात नमूद केलेले असेल असे अधिकार सहा. मुख्य लेखा अधिकारी हे वापरतात. कर्मचारी वर्ग खाते, विधी शाखा, जनसंपर्क शाखा, यांच्याकडून येणारे प्रस्ताव/धारीका ही ज्यामध्ये आकस्मिक खर्च अंतर्भूत आहे किंवा अर्थसंकल्पीय तरतूदीच्या संदर्भात असलेले प्रस्ताव जरी ते उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक किंवा महामंडळाचे अध्यक्ष यांना सादर करावयाचे असेल तरी अशा प्रस्तावांची तपासणी व सहमती मुख्य लेखा अधिकारी यांच्या वतीने सहा. मुख्य लेखा अधिकारी हे देतील. फक्त अपवादात्मक प्रकरणी सहा. मुख्य लेखा अधिकारी यांना यांना असे प्रस्ताव मुख्य लेखा अधिकारी यांच्या मार्फत सादर करणे गरजेचे वाटेल किंवा प्रस्तावात वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या मार्फत सादर करणे गरजेचे वाटेल किंवा प्रस्तावात नमूद केलेला खर्च चाकोरी बाहेरचा व अवास्तव असेल असे प्रस्ताव त्यांच्या चिकित्सक शेरे/विशिष्ट शिफारशींसह सादर करणे. | |
| | | १४. मध्यवर्ती कार्यालयातील लेखा खात्यातील अधिकारी व कर्मचारी कामावर वेळेवर हजर राहतील याची ते खातरजमा करणे. | |
| | | १५. मध्यवर्ती कार्यालयातील लेखा खात्यात काम करणारे वर्ग-३ व ४ कर्मचा-यांच्या बाबातीत प्रतिस्वाक्षरी करणारे अधिकारी व कक्ष अधिका-यांच्या बाबतीत प्रतिवृत्त लिहिणारे अधिकारी म्हणून काम करणे. | |
| | मुख्य लेखा अंतर्गत परीक्षण | १. मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक महामंडळाच्या सर्व विभागांच्या लेखा परिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करणे व वित्तीय वर्षात तो अंमलात आणला जात असल्याबाबतची खात्री करुन घेणे. लेखा परिक्षण कार्यक्रमातील कोणत्याही बदलास मुख्य अंतर्गत लेखा परिक्षकाची मान्यता घेणे. | |
| | | २. मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक हे महामंडळाच्या अंतर्गत लेखा परिक्षण पथकांचे प्रमुख असून | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | थेट वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांना प्रतिवेदन देतात. | |
| | | ३. मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक विभागांना दिलेल्या कार्यक्रमा अंतर्गत वेगवेगळया विभागाच्या लेखा परिक्षण अहवालाचा आढावा घेणे. | |
| | | ४. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या माहितीसाठी महामंडळाच्या अंतर्गत लेखा परिक्षणा संबंधीत प्रलंबीत परिच्छेदांची अर्धवार्षीक स्थिती तयार करतात व अंतर्गत लेखा परिक्षण परिच्छेद लवकर बंद व्हावेत प्रलंबीत परिच्छेदांचा आढावा घेणे. | |
| | | ५. लेखा परिक्षण पथकातील कर्मचा-यांच्या प्रवास भत्ता देयकांवर प्रतिस्वाक्षरी करतात. पगार पत्रके, पुरवणी देयके, प्रवास भत्ता देयके, वैद्यकीय बील, आकस्मिक खर्चासाठी उचल, प्रवास भत्ता उचल, कुटूंबासाठी मोफत पास (अंतर्गत लेखा परिक्षण पथकातील तृतीय श्रेणी कर्मचा-यांना ) इत्यादी बार्बीसंबंधी कार्यवाही करणे. | |
| | सहा./लेखा परिक्षण अधिकारी (मुख्यालय) | १. लेखा परिक्षण पथकांचा वार्षिक लेखा परिक्षणाचा अहवाल तयार करणे. | |
| | | २. लेखा परिक्षण पथकातील कर्मचा-यांसंबंधी आस्थापना विषयक कामे. | |
| | | ३. लेखा परिक्षण अधिका-यांच्या गरजेनुसार लेखा परिक्षण कालावधीत वाढ देणे/कमी करणे इत्यादी लेखा परिक्षण कार्यक्रमातील बदल करणे. | |
| | | ४. मुख्य अंतर्गत लेखा परिक्षकांच्या प्रवास दौ-याबाबतच्या टिपण्यांच्या पाठपुरावा करणे. | |
| | | ५. भांडार खरेदी खाते, प्रादेशिक कार्यालये, मध्यवर्ती कार्यशाळा पुणे/नागपूर/औरंगाबाद/भांडार विभाग कुर्ला व मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी या मध्यवर्ती घटक कार्यालयांच्या लेख्या संबंधीत लेखा परिक्षण अहवालांचा पाठपुरावा करणे. | |
| | | ६. अंतर्गत लेखा परिक्षण पथकाकडून आलेल्या लेखा परिक्षण अहवालांचा वेळेवर पाठपुरावा करणे. | |
| | | ७. अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल संबंधीत उत्तरांची छाननी करुन मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक यांना परिच्छेद बंद करण्यासाठी सादर करणे व त्यांच्या आदेशानुसार परिच्छेद बंद केल्याचे संबंधित विभागांना कळविणे. | |
| | | ८. अंतर्गत लेखा परिक्षण कक्षातील लेखाकारांच्या कामावर देखरेख ठेवणे. | |
| | | ९. अंतर्गत लेखा परिक्षण परिच्छेद संबंधित उत्तरे आल्यानंतर त्यांसंबंधीत पुन:आक्षेप संबंधित विभागांना पाठविणे व त्याचा शेवटपर्यंत पाठपुरावा करणे. | |
| | | १०.हजेरी पत्रक, रजा व शिस्तभंग कारवाई इ. प्रशासकीय कामे करणे. | |
| | सहा लेखा अधिकारी (नोंदणी) | १. डी फॉर्मव्दारे (जमा - खर्चाचे मासिक विवरण पत्र ) आलेल्या माहितीचे दरमहा संकलन करणे. | |
| | | २. मुंबई राज्य रस्ते वाहतूक महामंडळ अधिनियम - १९५२ प्रमाणे महामंडळाचे वार्षिक लेखे तयार करणे. | |
| | | ३. वित्तीय लेखांचे संगणकीकरण करुन घेणे. | |
| | | ४. प्रवासी कर, मोटर वाहन कर भरण्यासाठी आवश्यक असणारे प्रदान आदेश तयार करण्यापर्यंतचे काम करणे. | |
| | | ५. जमीन, इमारती, यंत्र सयंत्र व साधन सामग्री आणि गाडयांच्या मालमत्तेची नोंदवही ठेवणे आणि त्या प्रमाणे वार्षिक शिल्लकेच्या खतावणीशी (जनरल लेजरशी) ताळमेळ घालणे. | |
| | | ६. पोलीस मोटर वॉरंट, माजी विधान सभा सदस्य, लोकसभा, राज्यसभा सदस्य स्वातंत्र्य सैनिक यांना देण्यात येणा-या सवलतीची रक्कम शासनाकडून मिळणेसाठी पाठपुरावा करणे, तसेच बालक पोषण निधी गोळा करण्याबद्दल मिळणारी सेवा खर्चाची रक्कम, आंतरराज्य पार्सल वाहतूकीची रक्कम, पोष्ट खात्याकडून मिळवावयाची रक्कम याचा पाठपुरावा करणे. | |
| | | ७. प्रमुख लेखा नोंदवहया ठेवणे. | |
| | | ८. नविन लेखाशिर्ष देण्याविषयी तसेच मंजूर केलेल्या लेखा शिर्षाचे वर्गीकरण बदल लक्षात घेऊन अद्ययावत ठेवणे. | |
| | | ९. मध्यवर्ती कार्यालयाच्या महामंडळाचा डी फॉर्म संकलित करणे. | |
| | | १०. विभाग /घटकाकडून वर्षा अखेरीस भांडार सामग्रीची प्रत्यक्ष साठा इत्यादी मागवून घेणे व त्याची किंमतीत लेखा नोंदणी प्रमाणे तफावत असल्यास आवश्यक ती समायोजना करणे. | |
| | | ११. अखिल भारतीय राज्य रस्ते वाहतूक निगम (ASRTU) यांनी ठरवून दिलेल्या नमुन्यामध्ये महामंडळाचे नफा तोटा पत्रक व ताळेबंद तयार करणे. | |
| | | १२. गाडया आणि इतर मालत्ता या वरील घसा-याची तरतूद करणे. | |
| | | १३. तृतीय पक्ष विमा मालमत्ता यावरील घसा-याची तरतूद करणे. | |
| | | १४. जमिन अग्रीम रकमेची नोंदवही ठेवणे. | |
| | | १५. औद्योगिक गृह बांधणी योजनेंतर्गत घरे बांधण्याकरीता घेतलेल्या कर्जाच्या परतफेडी | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बाबतच्या नोंदी ठेवणे. | |
| | | १६. मध्यवर्ती कार्यशाळा व टायर नुतनीकरण केंद्राच्या खर्चात मध्यवर्ती घटकांच्या वरकड खर्चाचे समायोजन करण्यासाठी आवश्यक ते परिगणन करणे. | |
| | | १७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी यांनी वार्षिक लेख्या संदर्भात मध्यवर्ती कार्यालयास तसेच विभाग/घटकांना पाठविलेल्या लेखा परिक्षण आक्षेपांना निरीक्षकांना उत्तरे पाठविणे. | |
| | | १८. वार्षिक लेख्यांचे भाषांतर करणे व छपाईच्या कच्चा मसूदा तपासणे. | |
| | | १९. इतर राज्यांच्या रा.प. महामंडळाकडील येणी /देणी याबाबतची कार्यवाही करणे. | |
| | | २०. तेल पुरवठा करणा-या विविध कंपन्यांकडे महामंडळाने ठेवलेल्या अनामत रकमेची नोंदवही ठेवणे व त्यासंबंधीची कार्यवाही करणे. | |
| | | २१. विशिष्ट लेखा शिर्षा खाली शिल्लक असलेल्या रकमेंचा निपटारा करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रमावर सहामाहि बैठकीची व्यवस्था करणे. | |
| | | २२. नविन गाडयावरील जकात भरण्यासंबंधी आवश्यक ती माहिती विभागांना कळविणे. | |
| | | २३. निवासी लेखा परिक्षा अधिकारी व अंतर्गत लेखा परिक्षण पथक यांच्याकडून ताळेबंद बाबत किंवा धोरणात्मक बाबीं संबंधी आलेल्या लेखा परिक्षण आक्षेपांबाबत / निरीक्षणांबाबत संनियंत्रण करणे. | |
| | | २४. प्रत्येक विभागांच्या घटकांच्या बँकेच्या शिल्लकेची डी फॉर्म प्रमाणे शिल्लक रकमेशी पडताळणी करणे. | |
| | | २५. दैनंदिन हजेरीपट, कर्मचा-यांच्या रजा, शिस्तभंगाबाबत कारवाई इत्यादी प्रशासकीय काम पाहणे. | |
| | लेखा अधिकारी (अंदाज आणि वित्त) | १. वित्तीय सल्लागार यांच्या मार्गदर्शनाखाली व इतर खाते प्रमुखांशी सल्ला मसलत करुन वार्षिक व पंचवार्षीक योजना तयार करणे. | |
| | | २. महामंडळाचे महसूली व भांडवली वार्षिक अर्थसंकल्पीक अंदाज तयार करणे व ते महामंडळाच्या व राज्य शासनाच्या मंजुरीसाठी सादर करणे. | |
| | | ३. भांडवली अर्थसंकल्पावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवणे. | |
| | | ४. मासिक आगार अंदाजपत्रकाची छाननी करणे. | |
| | | ५. कर्जाची परतफेड, कर्जावरील व भांडवली अंशदानावरील व्याज इत्यादी संबंधीचे देयक आदेश काढणे. | |
| | | ६. विविध बँका व वित्तीय संस्थांना कर्जाच्या उभारणी संबंधी आवश्यक असलेली प्रपत्रे/कागदपत्रे/ गहाण खते इत्यादी तयार करणे. | |
| | | ७. मासिक रोख अर्थसंकल्प तयार करुन वित्तीय सल्लागार व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना सादर करणे. | |
| | | ८. भाडे पट्टीवरील गाडयांच्या प्रस्तावाची छाननी करणे व त्यासंबंधीचे करार करणे. | |
| | | ९. महाव्यवस्थापक (यंत्र अभियंता) यांनी चासीस व खातेवाहन खरेदीसंबंधी वित्तीय सल्लागार यांना सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करणे. | |
| | | १०. चासीस, खात्याची वाहने व या संबंधीच्या बिलाचे लेखा परिक्षण करुन अदा करण्यासाठी मंजुरी देणे. | |
| | | ११. महामंडळाच्या घसारा निधी व विमा निधी यांच्या संबंधीच्या धोरणाचा आढावा घेणे. | |
| | | १२. मध्यवर्ती कार्यशाळा व टायर पुन:स्तरण केंद्राकडून प्राप्त होणा-या उत्पादन खर्च विवरणपत्रांची छाननी करणे. | |
| | | १३. विधी सल्लागार यांच्याकडून विधी शुल्क अदा करण्यासाठी आलेल्या प्रस्तावांची लेखाकार (वित्त) यांच्या मार्फत छाननी करणे. | |
| | | १४. जनसंपर्क शाखेकडून प्राप्त झालेल्या प्रस्ताव/निविदा व दरपत्रके यांची लेखाकार वित्त यांच्या मार्फत छाननी करणे. | |
| | | १५. महामंडळ व त्यांच्या विविध समित्यांना सादर करावयाच्या प्रस्तावाची की ज्यामध्ये महामंडळाच्या निधीतील खर्चाचा समावेश आहे अशा सर्व लेखाकार (वित्त) यांच्याकडून मिळालेल्या प्रस्तावांची छाननी करणे. | |
| | | १६. मध्यवर्ती कार्यशाळा व टायर पुन:स्तरण केंद्रामधील उत्पादन उत्तेजन भत्ता.याबाबत प्रस्ताव आल्यास लेखाकार (वित्त) यांच्यामार्फत छाननी करणे. | |
| | सहा.लेखा अधिकारी (निधी व कर) | १. विभागांकडून मध्यवर्ती कार्यालयांकडे येणा-या व मध्यवर्ती कार्यालयाकडून विभागांना पाठविण्यात येणा-या निधीचा ताळमेळ ठेवणे. | |
| | | २. अतिरीक्त निधीची नियमानुसार गुंतवणूक करणे. गुंतवणुकीची नोंदवही ठेवणे व गुंतवणुकीसंबंधीची कागदपत्रे सुरक्षित ठेवणे. | |
| | | ३. सक्षम प्राधिका-यांची परवानगी घेऊन महामंडळाची नवीन खाती उघडण्यासंबंधात कार्यवाही करणे. अस्तित्वात असलेली बँक खाती उघडण्यासंदर्भात कार्यवाही करणे. अस्तित्वात | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेली बॅक खाती वापरण्यासंदर्भातील नियम व अटी यामध्ये आवश्यकता असल्यास बदल करणे. | |
| | | ४. मध्यवर्ती कार्यालयाच्या लेखा खात्यातील इतर शाखांकडून आलेल्या प्रदान आदेशांच्या आधारे महामंडळ स्तरावरील प्रदानांचे जसे प्रवासी कर, मोटरगाडी कर, तेल कंपन्यांकडील अनामत रकमा, चासी खरेदी, कर्ज परतफेड इ. धनादेश काढणे व त्यासाठी आवश्यक असलेल्या धनादेश नोंद वहया ठेवणे. | |
| | | ५. महामंडळाच्या आयकर निर्धारण संबंधीचे काम, विक्रीकर व उत्पादन शुल्कासंबंधी व कार्यशाळा यांच्याकडून आलेल्या संदर्भांना आवश्यकता असल्यास उत्तरे पाठविणे. | |
| | | ६. भारतीय स्टेट बॅक मुंबई सेंट्रल येथील बॅक खात्याचा ताळमेळ साधणे. | |
| | | ७. निधी व कर शाखेतील हजेरी पत्रक, रजा नोंदवही, शिस्त व अपील कार्यपध्दती इ. प्रशासकीय कामे पाहणे. | |
| | सहा.लेखा अधिकारी (ओएडी) | १. सत्यावत टिप्पणी, प्रारुप लेखा परिच्छेद, भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या अहवालातील परिच्छेद व सार्वजनिक उपक्रम समितीच्या अहवालातील शिफारशी तसेच अभिप्रायावर संबंधित खाते प्रमुखांकडून उत्तरे प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करणे. | |
| | | २. मध्यवर्ती कार्यालयांतर्गत येणा-या घटक कार्यालयातील शासकीय लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदांची उत्तरे प्राप्त करुन व त्यांची योग्य प्रकारे छाननी करुन निवासी लेखा परिक्षण अधिकारी यांना या परिच्छेदाची उत्तरे सादर करणे. | |
| | | ३. मध्यवर्ती कार्यालयांतर्गत येणा-या घटक कार्यालयांची वार्षिक संग्रह पडताळणी कार्यक्रम आखून त्या कार्यक्रमाची नीट अंमलबजावणी करणे. | |
| | | ४. महामंडळातील सर्व घटक कार्यालयातील चोरी, लबाडी व अफरातफर इत्यादी प्रकरणांची सहामाही माहिति संकलित करुन उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना सादर करणे. | |
| | | ५. प्रलंबित शासकीय परिच्छेदांसबंधी घटकनिहाय ३१ मार्च व ३० सप्टेंबर रोजी संपणा-या सहामाहीची माहिती उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेमार्फत स्थायी समिती समोर सादर करणे. | |
| | | ६. वेतन बिलाचे आगार पातळीवर व विभागीय पातळीवर विविध मुद्यांचे अंकेक्षण करुन घेणे. | |
| | | ७. ओ.ए.डी. शाखेतील कर्मचा-यांची रजा हजेरी पत्रक आणि शिस्त व अपिल कार्यपध्दती संबंधिचे प्रशासकीय काम पाहणे (Outside Audit Department) | |
| | <u>सहा/ लेखा अधिकारी (वेतन रोकड व संकीर्ण)</u> | १. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांची प्रवास भत्याची बिले लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | २. मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचा-यांच्या कुटूंब निवृत्ती योजनेची देखभाल करणे. | |
| | | ३. अध्यक्ष, महामंडळ सदस्य व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांची प्रवास भत्ता बिले लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | ४. मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचारी व अधिका-यांचे अंतिम भविष्य निर्वाह निधी देयके / अंशत: अंतिम भविष्य निर्वाह निधी देयके तयार करुन अदा करणे. | |
| | | ५. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपदानाच्या देयकांचे लेखा परिक्षण करुन देयके अदा करणे. | |
| | | ६. मध्यवर्ती कार्यालयातील निवृत्त कर्मचा-यांच्या इतर काही निवृत्ती लाभाच्या कामाबाबत कार्यवाही करणे. | |
| | | ७. मध्यवर्ती कार्यालयातील संकिर्ण बिले लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | ८. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची वैद्यकीय बिले व हॉस्पिटल बिले लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | ९. मध्यवर्ती कार्यालय स्वतंत्र विभाग म्हणून विधी व इतर देयकांचे लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | १०. कर्मचा-यांचे व अधिका-यांचे बाहेरील संस्था व शासकीय संस्थांचे धनादेश वितरीत करणे. | |
| | | ११. वेतन/निवृत्ती लाभ/रोकड/ संकिर्ण या उपखाते वहीची देखभाल करुन त्याचा ताळमेळ राखणे. | |
| | | १२. महामंडळाच्या बैठकी व इतर समारंभावर झालेल्या खर्चाचे बिलांचे लेखा परिक्षण करुन अदा करणे. | |
| | | १३. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांचे वेतन बिल तयार करुन त्यांचे लेखा परिक्षण करुन वेतन अदा करणे. | |
| | | १४. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांची वेतन निश्चिती, वार्षिक वेतन वाढ यांचे लेखा परिक्षण करुन वेतन व इतर भत्ते अदा करणे, तसेच रजा प्रवास भत्ता व रजेच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रोख रकमेत रुपांतर करण्याच्या देयकाचे वेतन अदा करणे. | |
| | | १५. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची मंजुरीप्रमाणे नियुक्ती पडताळणे. | |
| | | १६. महामंडळाकडून प्रतिनियुक्तीवर गेलेल्या कर्मचारी व अधिका-यांचा आस्थापना विषयक व्यवहार पाहणे. | |
| | | १७. प्रतिनियुक्तीवर गेलेल्या कर्मचा-यांची प्रत्यावर्तीत रजा व परतावा इत्यादी बाबतची कार्यवाही तसेच रा.प. बॅंक, विमा, सहकारी संस्था व अन्य वसुली ज्या कर्मचा-यांच्या व अधिका-यांच्या पगारातून वसूली केली आहे त्याचा भरणा करण्याबाबत कार्यवाही. | |
| | | १८. घर बांधणी अग्रीम, सण अग्रीम, स्कुटर मोटार कार अग्रीम व पगार अग्रीम प्रदान करण्याबाबत कार्यवाही करणे. | |
| | | १९. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीमधून परतफेड होणारे अग्रीम अदा करणे व त्याची वसुली करणे याबाबतची कार्यवाही करणे. | |
| | | २०. आस्थापनेवरील पगाराच्या कार्याची लेखा नोंदी करणे. | |
| | | २१. मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचारी व अधिका-यांच्या पगारातून थेट कापलेल्या आयकर व व्यवसायकर यांची विहित प्राधिका-यांस दस्तऐवज निर्धारित प्रपत्रे सादर करणे. | |
| | | २२. सानुग्रह अनुदान बोनस अदा करणे. | |
| | | २३. कर्मचारी/ अधिका-यांचे बॅंकेमार्फत पगार वितरीत करणे व त्याचे ताळमेळ घेणे. | |
| | | २४. मध्यवर्ती कार्यालयातील कर्मचारी व अधिका-यांच्या घरबांधणी अग्रीम, मोटर कार, स्कुटर अग्रीमांच्या अर्जाची पडताळणी करणे. | |
| | | २५. मध्यवर्ती कार्यालयातील रोकड उपशाखेचे परिक्षण, रोकड पुस्तक समायोजन नोंदवही, मुख्य खाते नोंदवही, धनादेश नोंदवही हाताळणे व व्यवहार अवलोकन करणे. | |
| | | २६. मध्यवर्ती कार्यालय घटक या करिता मासिक डी फॉर्मच्या आवश्यक लेखा नोंदी घेणे. | |
| | | २७. मध्यवर्ती कार्यालय घटक निवासी लेखा परिक्षा अधिकारी आणि अंतर्गत लेखा परिक्षा पथकाने उपस्थित केलेल्या आक्षेपाबाबत नियंत्रणात्मक सादरीकरण कार्यवाही. | |
| | | २८. प्रशासकीय कामे. | |
| | | २९. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांना पगार व रकमेचे वाटप करण्याची व्यवस्था करणे. | |
| | | ३०. मासीक टेलिग्राफीक फिगर जोडपत्र - अ, भविष्य निर्वाह निधी अनुसूची मध्यवर्ती कार्यालय भ.नि.नि. शाखेस विहित कालावधीत सादर करणे. | |
| | सहा/ लेखा अधिकारी (सामान्य) | १. अधिका-यांच्या वार्षीक बैठकीची व्यवस्था करणे. | |
| | | २. वरिष्ठ / सहा. रोखपालांच्या किमान हमी विमा काढण्याबाबत व्यवस्था करणे. | |
| | | ३. लेखा खात्याच्या प्रशासकीय बाबी हाताळणे. | |
| | | ४. अभिलेख (रेकॉर्ड रुम) कक्ष ठेवणे. | |
| | | ५. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी व उपमहाव्यवस्थापक (भां.व ख.) यांच्या कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग -४ कर्मचा-यांच्या घरबांधणी अग्रीम अर्जाची छाननी करणे. | |
| | | ६. महामंडळातील अधिका-यांचे घरबांधणी अग्रीम, स्कूटर मोटर सायकल अथवा मोटरगाडी यासाठी येणा-या अग्रीम अर्जाची तपासणी करणे. | |
| | | ७. कामगार करार व अधिकारी वर्गाचे करार संबंधाने येणारी कामे पाहणे. | |
| | | ८. कर्मचा-यांचे पंचवार्षीक बचत योजनेचे काम पाहणे. | |
| | | ९. कर्मचारी वर्ग खात्याकडून सेवा विनियम विषयी आस्थापना मुद्यांबाबत येणारे प्रस्ताव तपासणे. | |
| | | १०. सानुग्रह अनुदानाविषयी व महागाई भत्त्याबाबत परिपत्रके प्रसारीत करणे. | |
| | | ११. सेवाविनिमय विषयक व करारा संबंधात घटकाकडून उपस्थित केलेल्या शंकांची उत्तरे देणे. | |
| | | १२. मुख्य मंत्री सहाय्य निधिचे हिशेब ठेवणे. | |
| | | १३. संयुक्त विचार विनिमय यंत्रणेच्या अनुषंगाने येणारी काम पाहणे. | |
| | | वैद्यकिय देयके, प्रवास भत्ता देयके यासंबंधी धोरणात्मक बाबी तपासणे आणि मध्यवर्ती कार्यालय वगळता अन्या विभागांकडून येणा-या वैद्यकीय देयकांची तपासणी करणे. | |
| | सहा/लेखा अधिकारी (भ.नि.नि.) | १. भविष्य निर्वाह निधी अनुसूची संबंधीची पूर्तता करुन घेऊन ती संगणित्र शाखेकडे पुढील कार्यवाहीकरीता नियोजीत वेळेत पाठविणे. | |
| | | २. भ.नि.नि. विवरण पत्रिकांचे वेळेवर वाटप करणे. | |
| | | ३. म.रा.मा.प. महामंडळाच्या अंशदान भ.नि.नि. विनियमासंबंधी मुख्य लेखा अधिकारी यांच्याकडे संदर्भित केलेल्या प्रकरणांची तपासणी करणे. | |
| | | ४. भ.नि.नि. सभासदांच्या भ.नि.नि. खात्याचे आयोजन ताळेबंद करणे. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. अंतीम/अंशत: भ.नि.नि. देयकांची जेथे मुख्य लेखा अधिकारी यांची मंजुरी आवश्यक असेल अशा देयकांचे लेखा परिक्षण करणे. | |
| | | ६. भ.नि.नि. परतफेड अग्रीम अर्जाची जेथे मुख्य लेखा अधिकारी यांची संमती तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची मंजुरी आवश्यक आहे अशा भ.नि.नि. अग्रीमांच्या अर्जाचे लेखा परिक्षण करुन मंजुरीसाठी सादर करणे. | |
| | | ७. भ.नि.नि. कुटुंब निवृत्ती योजना व कर्मचारी ठेवींशी निगडीत विमा योजना/कर्मचारी निवृत्ती वेतन योजना यांच्या संबंधी जेव्हा आवश्यक असेल तेव्हा लेखा खात्याकडून सूचना प्रसृत करणे. | |
| | | ८. भ.नि.नि. खाते -१ व २ तसेच उपदान निधी यांची गुंतवणूक करणे. | |
| | | ९. भ.नि.नि. व उपदान निधी गुंतवणुकीवरील व्याज देय दिवशी गोळा करणे. | |
| | | १०. भ.नि.नि. खाते -१ व २ तसेच उपदान निधीचे हिशेब करुन वार्षिक लेखे तयार करणे. | |
| | | ११. गुंतवणूकीची नोदवही ठेवणे. | |
| | | १२. दरमहा गुंतवणुकीबाबत प्रत्यक्ष व नोंदीप्रमाणे तपासणी करणे. | |
| | | १३. गुंतवणूक रजिस्टर प्रमाणे गुंतवणूक केलेल्या गुंतवणूक रोख्यांची दर सहामाही तपासणी करणे. | |
| | | १४. निवासी लेखा परिक्षण अधिकारी यांच्या लेखा परिक्षण आक्षेपांना उत्तरे देणे. | |
| | | १५. उपदान गुंतवणुकीचे डिस्काऊंट दराने मूल्य मापन करणे. | |
| | | १६. भ.नि.नि. व उपदान विश्वस्तांची सभा अध्यक्षांच्या संमतीने आयोजीत करणे. | |
| | | १७. सभेत चर्चा करावयाच्या विषयांची तयारी करणे. | |
| | | १८. महामंडळ संचालकांच्या बैठकीमध्ये चर्चा करावयाच्या विषयांची तयारी करणे. | |
| | | १९. भ.नि.नि. खाते-१ व २ तसेच उपदानाच्या उपार्जित व्याजाची तपासणी करणे. | |
| | | २०. कर्मचारी भ.नि.नि. कायदा १९५३ आणि उपदान देय कायदा १९७२ च्या वैधानिक तरतूदींचे पालन करणे. | |
| | | २१. विभागीय स्तरावरील अधिका-यांचे उपदान देयकांची आणि उपदानाच्या संबंधातील तत्वांची पडताळणी करणे. | |
| | | २२. प्रशासकीय काम पाहणे. | |
| | <u>सहा/ लेखा अधिकारी</u> <u>(मुदत ठेव)</u> | १. व्याजाचे धनादेश मुदत ठेवीच्या पावत्या आणि ब्रोकरेज धनादेश यावर सहया करणे. | |
| | | २. मुदत संपलेल्या व्याजाचे धनादेश व ब्रोकरेजच्या धनादेशावर सहया करणे. | |
| | | ३. मुदत ठेवीच्या पावत्या आणि मुदत ठेव पूर्वीची देयके यांचे अंकेक्षण मंजुरी व सहया करणे. | |
| | | ४. रोकड नोंदवही दररोज तपासणे. | |
| | | ५. कॅनरा बॅंक लेखा शिर्ष ८३६, भारतीय स्टेट बॅंक (व्याजाचे धनादेश व ब्रोकरेज धनादेश) "डी" स्टेटमेंट, मुदत ठेवीचे अर्ज या सर्वांच्या हिशोबाचा ताळेबंद करणे. | |
| | | ६. मुदत ठेव अर्जाची माहिती संगणक यंत्राव्दारे पुरविणे व दरमहिन्याच्या १० तारखेच्या आत ऑन-लाईन मुदत ठेव सिस्टीम मार्फत अंतीम प्रिंट आऊट घेणे. | |
| | | ७. मुदत ठेव शाखेतील कामकाजाबाबत सुधारणा करण्याकरीता महामंडळास प्रस्ताव सादर करणे. | |
| | | ८. कर्मचारी हजेरी पत्रक कर्मचा-यांच्या रजा, प्रमाद प्रकरणे, स्टेशनरी खरेदी, इतर दैनंदिन कामासंदर्भातील प्रशासकीय कामकाज पार पाडणे. | |
| | | ९. फंड प्रोसेस दररोज तपासणे. | |
| | | १०. आयकराचे तक्ते वेळोवेळी आयकर खात्यास सादर करणे. मुदत ठेवीदारांकडून आयकर कपात झाल्यास त्याची माहिती आयकर खात्यास पाठविणे. | |
| | | ११. मुदत ठेव, मुदतपूर्ती व नुतनीकरण बाबत लेखाशिर्ष ६६९चे ताळमेळ करणे. | |
| | | १२. मुदत ठेव मुदतपूर्ती नंतर देण्यात येणारे धनादेश सहया करणे. | |
| | | १३. मुदत ठेवीवरील व्याजाचे, ब्रोकरेजची रक्कम ECS द्वारे रक्कम अदा करणे यावर नियंत्रण ठेवणे. | |
| | | **<u>स्थापत्य खाते</u>** | |
| ७१ | महाव्यवस्थापक (स्थापत्य) | स्थापत्य संबंधी कामाची पंचवार्षिक योजना, वार्षिक योजना व अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे. त्याचप्रमाणे जमीन संपादन व रा.प. आस्थापनाचे बांधकाम आणि देखभाल हे या खात्याचे मुख्य कार्य असून विविध विभागांकडून प्राप्त आराखडे व अंदाज यांच्या निविदा यांची छाननी करुन त्या निविदा समितीला सादर करणे. स्थापत्य कामाची तपासणी करणे, स्थापत्य कामाबाबत मुख्य कार्यकारी अधिका-यांना तांत्रिक बाबींसंबंधी सल्ला देणे आणि विभागीय स्थापत्य कामावर देखभाल व नियंत्रण ठेवणे. | |
| ७२ | कार्यकारी अभियंता | १. बांधकामासोबत तरतूद केलेल्या विद्युतीकरणाच्या कामाच्या व्यतिरीक्त, केवळ विद्युती संच | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (विद्युत) (म.का.) | मांडणीची कामे, विद्युत सब-स्टेशन, विद्युत उपकरणे (एअर कंडीशनर, वॉटर कुलर, जनरेटर, पाण्याचे पंप ) इ. बाबीची वेगळी प्रशासकीय मान्यतेची मंजुरी घेणे.<br>२. विद्युतीकरणाच्या भांडवली कामांची व विद्युत उपकरणे यांच्या दुरुस्तीची तांत्रीक मान्यता देणे.<br>३. खातेनिहाय निविदा समितीपुढे विद्युतीकरणाच्या कामासंबंधीत प्रस्ताव सादर करणे.<br>४. विद्युतीकरणाच्या मूळ स्वरुपाच्या मोठया व महत्वाच्या तसेच अंदाजपत्रकात नमूद केलेल्या कामांवर सर्वसाधारण नियंत्रण.<br>५. मध्यवर्ती कार्यालयांतर्गत विद्युतीकरणाच्या कामांच्या निविदा मागविणे स्वीकारणे व कामे करणे. तसेच विभागीय अभियंता (विद्युत) यांचे मार्फत विद्युत संच मांडणी व विद्युत उपकरणांची ( उद्वाहन, एअर कंडीशनरर्स, वॉटर कुलर, पाण्याचे पंप्स इ. ) सर्वसाधारण देखभाल.<br>६. कूपनलिकेवर बसविण्यात येणा-या वॉटर पंपाच्या कामांवर सर्वसाधारण नियंत्रण<br>७. विद्युत सामुग्रीच्या भांडार व खरेदी खात्यामार्फत मागविण्यात येणा-या निविदांवर तांत्रिक अभिप्राय देणे व सर्वसाधारणपणे या सामुग्रीच्या दर्जावर नियंत्रण ठेवणे.<br>८. विशेष दुरुस्तीच्या कामांचा पाठपुरावा करणे.<br>९. महामंडळाच्या इमारतींना तरतूद केलेल्या वीज संच मांडणीत कमी अथवा उच्च दाबाचा वीज पुरवठा, वीज नियंत्रण, खंडीत पुरवठा इत्यादी प्रकरणे हाताळणे व तत्संबंधी वीज कंपनी/महाराष्ट्र राज्य वीज मंडळाशी/शासनाशी पत्रव्यवहार करणे.<br>१०. प्रादेशिक विभागांतर्गत कार्यकारी अभियंता (वि), विभागीय अभियंता (वि), कनिष्ठ अभियंता (वि) यांचे कामांवर सर्वसाधारण नियंत्रण, तसेच निविदेत नमूद केलेल्या शर्ती व अटीस अधीन राहून विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्याचे कालावधीत ठेकेदारांस वाढ देणे, विलंब झालेल्या कामांचे बाबतीत दंड करण्याचा प्रस्ताव सादर करणे इत्यादी प्रकरणे हाताळणे.<br>११. विद्युत शाखेतील कर्मचारी व अधिकारी यांच्या आस्थापनेसंबंधी पत्रव्यवहार करणे, प्रस्ताव सादर करणे. इ.<br>१२. विद्युतीकरणाच्या कामांच्या संदर्भात लेखा परिक्षण आक्षेपांना उत्तरे देणे.<br>विद्युतीकरणाचे संबंधीत वरिष्ठांनी सांगितलेली तसेच इतर सर्व संकिर्ण बाबीचा पत्रव्यवहार व प्रकरणे हाताळणे. | |
| | मुख्य स्थापत्य अभियंता | १. संपूर्ण महाराष्ट् राज्यातील ६ प्रादेशिक कार्यालये आणि सुमारे ३१ विभागीय कार्यालये यांच्याकडून प्रशासकीय मंजुरीकरीता येणा-या प्रस्तावांची तांत्रिक छाननी करुन घेणे,<br>२. प्रस्तावासंबंधीत खातेप्रमुखांमार्फत सक्षम अधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठविण्याची व्यवस्था करणे आणि मंजुरीनंतर त्यासंबंधी संबंधीत कार्यकारी अभियंता यांना पुढील कार्यवाही करण्यास कळविणे.<br>३. वरिल प्रमाणेच सर्व निविदांचे प्रस्ताव छाननी करुन घेणे अणि ते संबंधीत खातेप्रमुखांमार्फत सक्षम अधिकारी/समिती यांच्याकडे सादर करणे अणि त्यावरील निर्णय संबंधीत कार्यकारी अभियंता यांच्याकडे कळविणे.<br>४. अंतर्गत लेखा परिक्षक आणि सरकारी लेखा परिक्षक यांच्याकडून जे अहवाल येतात त्यावर संबंधितांच्याकडून माहिती मागवून योग्य तो खुलासा तयार करणे.<br>५. निरनिराळया वरिष्ठ अधिका-यांकडून आणि मंत्रालयाकडून, विशेष लोकप्रतिनिधींकडून स्थापत्य अभियांत्रिकी खात्यासंबंधी विचारणा झालेल्या प्रश्नांवर उत्तर तयार करवून घेणे व पाठविणे.<br>६. स्थापत्य अभियांत्रिकी खात्याच्या मध्यवर्ती कार्यालयातील कार्यालयीन कामे उदा. रजा, आगाऊ रक्कम देणे वैगरे आस्थापना या विषयी संबंधीची सर्व कामे करुन घेणे. | |
| | कार्यकारी अभियंता वास्तूशास्त्रज्ञ | १. म.रा.मा.प. महामंडळाच्या संपूर्ण राज्यभर बांधकाम सुरु असलेल्या व प्रस्तावित इमारती उदा. बस स्थानके आगार, विभागीय कार्यशाळा, विभगीय कार्यालये, टायर पुन:स्तरण केंद्रे, प्रादेशिक कार्यालये,कर्मचा-यांसाठीची निवासस्थाने, चालक/वाहक विश्रांतीगृहे, इत्यांदीसाठी वास्तुशास्त्रीय आराखडयानुसार प्रचलित सिमेंट कॉक्रिट (आर.सी.सी.) व स्ट्रक्चरल स्टील सामानामध्ये (संकल्पचित्र) डिझाईन तयार करणे व तद्नुसार रेखाचित्रे (ड्रॅइंग्ज्) करवून घेणे.<br>२. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयामार्फत आलेली विविध कामांची अंदाजपत्रके वरील कामाच्या संदर्भात तपासणे.<br>३. सुरु असलेल्या बांधकामांच्या पैकी महत्वाच्या व आवश्यक त्या ठिकाणी भेट देऊन बांधकाम स्ट्क्चरल डिझाईननुसार तपासणे व त्याबाबत काही अडचणी असल्यास त्याचे निवारण करणे.<br>४. सर्व विभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता यांना त्यांचे मध्यवर्ती कार्यालयातील भेटीत | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | चर्चेच्यावेळी स्ट्रक्चरल डिझाईन संदर्भातील काही अवघड भागांबद्दल सल्ला देणे व जरुर त्या सूचना देणे. | |
| | विभागीय अभियंता (म.का) | १. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील व प्रादेशिक कार्यालये आणि त्यांच्या अखत्यारीत येणारी विभागीय कार्यालये यांच्याकडून प्रशासकीय मंजूरी करिता येणा-या प्रस्तावाची तांत्रिक छाननी करुन घेणे, प्रस्ताव संबंधीत खातेप्रमुखांमार्फत सक्षम अधिकारी यांच्या मंजुरीसाठी पाठविण्याची व्यवस्था करणे आणि मंजुरीनंतर त्यासंबंधी संबंधीत कार्यकारी अभियंता यांना पुढील कार्यवाही करण्यास कळविणे.<br>२. वरील प्रमाणेच सर्व निविदांचे प्रस्ताव छाननी करुन घेणे आणि ते संबंधित खातेप्रमुखांमार्फत सक्षम अधिकारी/समिती यांच्याकडे सादर करणे अणि त्यावरील निर्णय संबंधित कार्यकारी अभियंता यांच्याकडे कळविणे.<br>३. अंतर्गत लेखा परिक्षक आणि सरकारी लेखा परिक्षक यांच्याकडून जे अहवाल येतात त्यावर संबंधितांकडून माहिती मागवून योग्य तो खुलासा तयार करणे.<br>४. स्थापत्य अभियांत्रीकी खात्याच्या मध्यवर्ती कार्यालयातील कार्यालयीन कामे उदा. रजा, आगाऊ रक्कम देणे वैगरे आस्थापना या विषयासंबंधीची सर्व कामे करुण घेणे.<br>५. निरनिराळया वरिष्ठ अधिका-यांकडून आणि मंत्रालयाकडून विशेष लोकप्रतिनिधींकडून स्थापत्य अभियांत्रिकी खात्यासंबंधी विचारणा झालेल्या प्रश्नांवर उत्तरे तयार करुन घेणे आणि ती पाठविण्याची व्यवस्था करणे.<br>६. हया व्यतिरीक्त स्थावर व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहे. | |
| | आस्थापना पर्यवेक्षक | १. विधिमंडळ कामकाजामध्ये उपस्थित होणारे प्रश्न लक्षवेधी सूचना, कपात सूचना इ.बाबत माहिती प्राप्त करुन त्याचे संकलन व खुलासे तयार करणे.<br>२. मा. मंत्री, लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त होणा-या सुचना, मागणी, विचारणा इ.बाबत माहिती प्राप्त करुन टिप्पणी तयार करणे.<br>३. भूसंपादन व न्यायालयीन प्रकरणांचा प्रगती अहवाल तयार करणे.<br>४. भूसंपादन प्रस्ताव प्राप्त झाल्यावर मंजुरी बाबतची टिप्पणी प्रस्ताव तयार करणे, प्रस्तावाच्या मंजुरीची बाब सक्षम प्राधिकारी, स्थायी समिती, संचालक मंडळास सादर करण्यासाठी तयार करणे.<br>५. भूसंपादन प्रकरणातील आरक्षित जागा वगळणे, विकास आराखड्यातील आरक्षित जागेचा वापर अथवा आरक्षण रद्द करावयाचे असल्यास त्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची टिप्पणी तयार करणे.<br>६. रा. प. जागा, इमारती भाड्याने देणे, भाड्याने घेणे, विल्हेवाट लावणे बाबत प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन टिप्पणी तयार करणे.<br>७. उदभवलेल्या न्यायालयीन प्रकरणामध्ये वकिलांच्या नियुक्ती, व्यवसाय शुल्क व प्रकरणांचा पाठपुरावा याबाबतची कार्यवाही करणे.<br>८. भूसंपादन प्रकरणातील वाढीव मावेजाबाबतची टिप्पणी तयार करणे.<br>९. स्थानिक स्वराज्य संस्थांनी, शासनाने वेळोवेळी आकारणी केलेल्या कराची पडताळणी करुन त्याबाबतच्या मंजुरीची टिप्पणी तयार करणे.<br>१०. सेवासदनिकांचे वाटपाबाबत, त्याबाबत उपस्थित होणा-या वेळोवेळच्या प्रकरणांबाबत सर्व प्रकारचे टिप्पणी प्रस्ताव तयार करणे.<br>११. जुन्या आस्थापना / इमारती बाबत पुनर्विकासाबाबत प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन टिप्पणी प्रस्ताव तयार करणे.<br>१२. वरिष्ठांच्या निदेशांप्रमाणे आवश्यक पत्रव्यवहार तयार करणे.<br>१३. अंतर्गत/ शासकीय लेखा आक्षेपांबाबत संबंधित कार्यकारी अभियंता/विभागीय अभियंता कार्यालयाकडून माहिती, खुलासा प्राप्त करुन प्रारुप उत्तर तयार करुन सादर करणे. | |
| | | **<u>सांख्यिकी शाखा</u>** | |
| | <u>मुख्य सांख्यिकी अधिकारी</u> | १. सांख्यिकी शाखा प्रमुख म्हणून घटकांतील सांख्यिकी अधिकाऱ्यांवर कामकाज नियंत्रण व प्रशासकीय नियत्रंण.<br>२. घटकामध्ये अचुक, विहित कालमर्यादेत माहिती प्राप्त करण्याकरिता परिपत्रकीय सूचना प्रसारित करणे.<br>३. घटकांकडून प्राप्त झालेल्या माहिती नियत कालमर्यादेनुसार निर्णयार्थ सादर करणे.<br>४. घटकांमध्ये स्थानिक पातळीवर संकलित करण्यात येणारी माहिती विहित कालमर्यादेत सादर करण्याकरिता मध्यवर्ती स्तरावर उचित कार्यवाही करणे.<br>५. शासनाचे वेगवेगळे विभाग उदा: अर्थ व सांख्यिकी संचालनालय, परिवहन आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण इत्यादींना महामंडळाची माहिती प्राप्त करुन देणे. | |

| | | | |
|---|---|---|---|
